# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक २०.०४.२०२६ सोमवार

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे शांतीनगर :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०४.२०२६ चे २०.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे शांतीनगर चे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत लालगंज, एकनाथ सावजी भोजनालय बिल्डींगचे पहिल्या माळयावरील रुममध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) महेश रमेश बिनेकर वय २५ वर्षे रा. लालगंज, खैरीपुरा २) सुनिल मारोतराव पडधान वय ३८ वर्षे, रा. एकनाथ सावजी हॉटेलसमोर, लालगंज, नागपुर ३) शक्ती तुळशीराम धकाते वय ३४ वर्षे ४) मनोज एकनाथ बिनेकर वय ४३ वर्षे ५) शुभम शिवकुमार हिरणवार वय ३० वर्षे सर्व रा. लालगंज, खैरीपुरा, नागपूर ६) किरण चंद्रकांत धार्मिक वय ३३ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४३, अन्नपुर्णा नगर, कळमणा, नागपुर हे समक्ष ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ६,३००/—रू., ताश पत्ते व ईतर साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे शांतीनगर येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १८.०४.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी भास्कर विस्तारी गजभिये वय ६८ वर्षे, रा. महात्मा फुले चौक, आंबेडकर नगर, वाडी, नागपूर हे त्यांची पत्नी श्रीमती शोभा भास्कर गजभिये वय ६५ वर्ष यांचेसोबत मोटार सायकल क्र. एमएच ४० एवाय ९८१८ ने डबलसीट पोलीस ठाणे पारडी हद्दीत, भंडारा नागपूर रोड, उमिया गेट कटींगजवळ, पारडी येथून जात असता, एका अज्ञात ट्रक चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटरसायकलला धडक दिल्याने दोघेही रोडवर खाली पडले. फिर्यादीचे पत्नीचे दोन्ही पायावरुन ट्रकचे चाक गेल्याने त्या गंभीर जखमी होऊन बेशुध्द झाल्या. फिर्यादीसुध्दा जखमी झाले. ट्रकचालक ट्रकसह पळुन गेला. जमलेल्या लोकांनी दोन्ही जखमी यांना उपचाराकरीता भवानी हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. फिर्यादीचे पत्नीचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे सपोनि गजानन कंकाळ ९०४९५००३५६ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**पोलीस ठाणे खापरखेडा :—** दिनांक १९.०४.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, प्रफुल छोटू कुंभरे वय १८ वर्ष रा. वलनी खदान, खापरखेडा हा त्याचे दुचाकीने तसेच सरगम सुनिल साखरे वय २५ वर्ष रा. वार्ड क्र. ३, रोहणा, ता. सावनेर जि. नागपूर हा त्याचे दुचाकीने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत मौजा रोहणा येथुन जात असता, दोघेही अपघात होऊन गंभीर जखमी झाले. प्रफुल छोटू कुंभरे यास उपचाराकरीता कुणाल हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी दिनांक २०.०४.२०२१ चे ०१.३० वा. सुमारास मृत घोषीत केले. तसेच सरगम सुनिल साखरे यास उपचाराकरीता जावेद नर्सिंग होम, पिपळा डाक बंगला येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे मसफौ. प्रतिभा डाखोळे ८९९९१९९०१२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन:—** सौ. प्रिया नितेश पाल वय ४२ वर्षे रा. पडोळे नगर, हनुमान मंदीराजवळ, नागपूर ह्या दिनांक १२.०४.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—निमगोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, अंगात— पिवळया रंगाची साडी, पायात चप्पल घातलेली आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळखचिन्ह — उजव्या हातावर ओम चिन्ह गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे शांतीनगर:—** विनय गणेश अरे वय २० वर्षे रा. लालगंज, पाण्याचे टाकीजवळ, शांतीनगर, नागपूर हा दिनांक १४.०४.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा— लांब, बांधा— मध्यम, उंची — ५ फुट ८ इंच, केस—काळे, अंगात— टिशर्ट व पांढरा बर्मुडा घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतो.

**३) पोलीस ठाणे शांतीनगर:—** कु. खुशी राजकुमार रजक वय १७ वर्षे रा. ए.आर. फुले कॉलेजजवळ, शांतीनगर, नागपूर ही दिनांक २०.०१.२०२६ चे १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. आजपावेतो घरी परत आलेली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची — ५ फुट, केस—काळे, अंगात— आसमानी रंगाचा शर्ट व निळया रंगाची पॅन्ट घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.


सौ. प्रिया


विनय


कु. खुशी

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. २रे अति. मुख्यदंडाधिकारी साहेब, नागपुर. | ६६०६/ २०१५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | मिलींद बी. मेश्राम, सीईओ, न्यु जन विकास कन्सलटेन्सी प्राय. लि., देशपांडे ले आऊट, नागपुर | २७.०४.२०२६ |
| २ | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, नागपूर | ३०११५६/ २००७ | कलम १४३,१४७,१४८,४२७ भादंवि | १) आनंद उर्फ पलटन एल.गुजर वय २० वर्ष रा. बारासिंगल, बोरकर नगर, तुलसी बहेरीयाचे घराजवळ, नागपूर. २) निलेश आर. फासे, रा. जाटतरोडी नं. ०२, फेंडरच्या घराजवळ नागपूर ३) राम अ. मसराम, रा. जाटतरोडी नं. ०१, सुरेश मोरेच्या घरी किरायाने नागपूर ४) पप्पु उर्फ वाघूर एम. बहोरीया, वय २० वर्षे, रा. बारासिंगल, बोरकर नगर, तुलसी बहेरीयाचे घराजवळ, नागपूर. | २३.०४.२०२६ |
| ३. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०३, नागपूर | ३०४५७५/ २०१३ | कलम ३२४, ५०४ भादंवि | रामेश्वर शिवकुमार वर्मा, रा. धरम नगर, प्लॉट नं. १५९, शितला माता मंदीरजवळ, नागपूर | ०८.०५.२०२६ |
| ४. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०३, नागपूर | ३०४९०३/ २०१३ | कलम ३२४, ३२५ भादंवि | नंदू संतलाल गुप्ता, रा. भंडारा रोड नाका नं. ०५, पोल्ट्री फार्मजवळ, नागेश्वर नगर, प्लॉट नं. ९/१०, नागपूर | ११.०५.२०२६ |
| ५. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०३, नागपूर | ३१३३४४/ २००८ | कलम २७८,३३८, ३०४ (अ) भादंवि | सुनिल गेंदरावजी गव्हाळे, वय २२ वर्षे, रा. पारडी, भंडारा रोड, प्रकाश हायस्कुलचे मागे, लक्ष्मी कटरेचे घरा शेजारी, नागपूर | ०८.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **६.** | मा. २रे अति. मुख्यदंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०२३९ /२००५ | कलम ३५३ भा.दं.वि. | गोपाल उर्फ काल्या पांडूरंग गुरव, रा. आराधना रोड, खरबी रोड नागपूर | १९.०५.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**